# नागरिकांची सनद

गृह विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

[किंमत : रु. ३०.००]

एच २७८९–१

# नागरिकांची सनद

## प्रस्तावना

गृह विभाग हा महाराष्ट्र शासनाचा एक अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. या विभागामार्फत राज्यातील 'कायदा व सुव्यवस्था' राखण्याचे काम करण्यात येते. प्रशासनिक सोयी आणि कार्यक्षमतेसाठी गृह विभागाचे 'कायदा व सुव्यवस्था' आणि परिवहन असे दोन विभाग करण्यात आले होते. नंतर परिवहन विभागाचे विभाजन करून दोन नवीन भाग (१) परिवहन व तुरुंग (२) राज्य उत्पादन शुल्क असे दि.१६ डिसेंबर १९८५ पासून करण्यात आले आहेत. गुन्हे प्रतिबंध व अन्वेषण कायदा व सुव्यवस्थेचे पालन, पोलीस होमगार्ड व नागरी संरक्षण यांचे प्रशासन व नियंत्रण आणि न्याय, प्रशासन तसेच गृह (मंत्रालय) विभागाची आस्थापना अशी विभागाची सर्वसाधारण रचना आहे.

## २. गृह विभागाची रचना

मा.मंत्री (गृह) हे गृह विभागाचे प्रभारी मंत्री असून मा.राज्यमंत्री यांच्या अधिपत्याखाली अपर मुख्य सचिवासह २ प्रधान सचिव व १ सचिव हे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आहेत. विभागाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विभागात एकूण ५२ कार्यासने निर्माण करण्यात आली आहेत. पोलिसांशी निगडीत बाबी हाताळण्याकरिता कार्यासन पोल-१ ते पोल-१५, विदेशी नागरिकांच्या बाबी हाताळणारी विदेशी-१ व २ राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या अनुषंगाने संबंधित सर्व बाबी विशेष-१ अ ते विशेष-१० ही कार्यासने पोलीस उप विभागांतर्गत येतात. राज्यातील कारागृहविषयक सर्व बाबी तुरुंग-१ ते ३, बंदरासंबंधीच्या सर्व बाबी बंदरे-१ व २. राज्य उत्पादन शुल्क या उप विभागांतर्गत रा.ऊ.शु.-१ ते ३ ही कार्यासने येतात. त्याचप्रमाणे परिवहन उप विभागांतर्गत परिवहन-१ ते ५ ही कार्यासने येतात.

## ३. गृह विभागाची मुख्य कार्ये

सार्वजनिक सुव्यवस्था राखणे, राष्ट्रीय कायदा अंतर्गत स्थानबद्धता, पोलीस दलाचे संपूर्ण पर्यवेक्षण करणे, पोलीस दलाकडून झालेल्या चुका व अतिरेकाची चौकशी करणे, पोलीस दलाचे आधुनिकीकरण करणे, पदांची, पोलीस ठाण्याची/पोलीस चौक्यांची निर्मिती करणे, पोलीस गोळीबाराची दंडाधिकारीय/न्यायिक चौकशी करणे, पोलीस आस्थापनाविषयक प्रकरणे, पोलीस कल्याण, पोलीस गृह निर्माण व इमारती आणि पोलिसांना साधनसामग्री पुरविणे. परिवहन, राज्य उत्पादन शुल्क, राष्ट्रीय सुरक्षा कायदा व स्थानबद्धतेसंबंधी धोरणात्मक बाबी, कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात हद्दपारी व यासंबंधातील संविधानिक अपिले, महाराष्ट्र चित्रपट नियम अधिनियम, १९५३ त्या खालील अपिले, हॉटेल परवाना याबाबतची अपिले.

## ४. नियम/शासन निर्णय

या विभागाशी संबंधित नियम अथवा महत्त्वाचे शासन निर्णय *www.maharashtra.gov.in* या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. या विभागाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या नियम तथा शासन निर्णयाबाबतची माहिती *www.maharashtra.gov.in* या संकेत स्थळावर अद्ययावत करण्यात येते.

## ५. गृह विभागाच्या नियंत्रणाखालील विभाग /कार्यालये

१) पोलीस विभाग

२) गृहरक्षक दल

३) नागरी संरक्षण दल

४) तुरुंग

५) राज्य उत्पादन शुल्क

६) परिवहन

७) बंदरे

८) सरकारी अभियोग संचालनालय

९) न्याय सहायक वैज्ञानिक संचालनालय

**६. जनसामान्यांकडून सूचना**

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करून त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. गृह विभागाच्या अधिनस्त येणाऱ्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमीच सहकार्य करेल.

**७. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी**

गृह विभाग नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबद्ध आहे. गृह विभाग आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्यभावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करून देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी विभागातील प्रत्येक अधिकारी/कर्मचाऱ्यांची राहील.

**********

# परिशिष्ट - १

## गृह विभाग

मा.मुख्यमंत्री/मा.मंत्री (गृह)/मा.मंत्री (राऊशु)/मा.राज्यमंत्री (गृह/राऊशु/परिवहन)

| अ.क्र. (१) | अपर मुख्य सचिव (२) | प्रधान सचिव (अ. व सु.) (३) | प्रधान सचिव (परिवहन, बंदरे व राऊशु ) (४) | सचिव (विशेष) (५) |
|---|---|---|---|---|
| १ | पोल-१, पोल-१ अ, पोल-२, पोल-४ (पदर्निमिती) पोल-१५, भापोसे कक्ष, सेकपी-१, बीयुडी-१ व २, विशा-१ अ, विशा-३ ब, विशा-४, विशा-१० व धोरणात्मक बार्बीची पोलीस विभागाशी संबंधित सर्व कार्यासनांची प्रकरणे | पोल-५ अ, पोल-५ ब, पोल-६ अ, पोल-६ ब, पोल-१०, विशा-३ अ, विशा-५, विशा-७ आस्था-१, आस्था-२, आस्था-३, रोखशाखा, तुरुंग-१, २ व ३ | परिवहन-१, परिवहन-२, परिवहन-३, परिवहन-४, परिवहन-५ (रेल्वे), बंदरे- १, बंदरे-२, राऊशु-१, राऊशु-२ व राऊशु-३ | पोल-३, पोल-४ (पदर्निमिती वगळून) पोल-७, पोल-८, पोल-९, पोल-११, पोल-१२, पोल-१३, पोल-१४, विशा-१ ब, विशा-२, विशा-६, विशा-८, विदेशी-१ व विदेशी-२ |

## पोलीस विभाग

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | कार्यवाही | सेवा पुरविणारे अधिकारी | कालमर्यादा | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाचे अधिकारी नाव व हुद्दा | प्रस्तावासोबत आवश्यक कागदपत्रे (नियम) |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | शस्त्र परवान्याची विनंती/शस्त्र परवाना रद्द/ तहकूब केल्याच्या आदेशाविरुद्ध अपिल (शस्त्र अधिनियम कलम १८ (१) शस्त्र परवाना आदेशाविरुद्ध अपिल). | जेथे पोलीस आयुक्तालय आहे तेथील पोलीस आयुक्तांनी शस्त्र परवाना मंजूर करण्याची विनंती अमान्य केल्यास शासनाकडे अपिल करता येते. (शस्त्र परवाना प्राधिकारी जिल्हादंडाधिकारी असल्यास विभागीय आयुक्त (महसूल) यांच्याकडे अर्ज करावा). | मा.मंत्री (गृह) व त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी सचिव (विशेष) गृह विभाग | - | मा. मंत्री (गृह) | अपिलकर्त्याने अपिलासोबत रु.१०० ची पोस्टल ऑर्डर व आयुक्तांच्या नामंजूर आदेशाची प्रत जोडून शस्त्र परवाना मिळण्यासाठी संयुक्तिक कारणासह सचिव (विशेष) गृह विभाग यांच्या नावे अपिल करावे. |
| २ | शस्त्र परवान्याच्या क्षेत्रात वाढ करणे | शस्त्र परवाना प्राधिकारी सर्वसाधारणपणे शस्त्र परवानाधारकाच्या जिल्ह्यापुरता किंवा राज्यापुरता शस्त्रपरवाना मंजूर करतो. शस्त्रपरवानाधारकाला आपल्या शस्त्र परवान्याचे क्षेत्र वाढवावयाचे असल्यास केंद्र शासनाने राज्य शासनास त्याच्या लगत असलेल्या | सचिव (विशेष) सचिव, गृह विभाग मंत्रालय, मुंबई सचिव, गृह मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली | ३ महिने | मा. मंत्री (गृह) | शस्त्र परवानाधारकाने अपिलासोबत शस्त्र परवान्याची प्रत, क्षेत्रवाढ करण्याचे संयुक्तिक कारण, व्यवसायासंबंधीची कागदपत्रे, वार्षिक आयकर विवरणपत्रे व मूळ आदेशाची प्रत इत्यादी आवश्यक कागदपत्रे जोडावीत. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कमाल ३ राज्यापुरतीच शस्त्र परवान्याचे क्षेत्र वाढ करण्याचे अधिकार प्रदान केले आहेत. त्याचप्रमाणे खालील विशिष्ट प्रवर्गातील व्यक्ती - १. केंद्र सरकारमधील विद्यमान मंत्री/ संसद सदस्य<br>२. सैन्य दलातील किंवा निम्न सैन्य दलातील व्यक्ती<br>३. भारतीय सेवेतील अधिकारी<br>४. ज्याची कर्तव्यार्थ भारतभर कोठेही नियुक्ती/ बदली होऊ शकेल असा अधिकारी<br>५. खेळाडू यांना प्रथम ३ वर्षांकरिता सचिव (विशेष) गृह यांच्या स्तरावर शस्त्र परवाना भारतभर करण्याबाबत मंजुरी प्रदान करता येते. मात्र, इतर व्यक्तींना शस्त्र परवाना भारतभर करण्याबाबतच्या मागणीस राज्य शासनाने मंजुरी देण्यापूर्वी केंद्र शासनाची मंजुरी घेणे आवश्यक आहे. | | | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ३ | शस्त्राच्या अनामत कालावधीत वाढ करण्याबाबत (महाराष्ट्र शस्त्र अधिनियम प्रकरण ६ परिच्छेद ८४) | शस्त्र परवानाधारकाचा मृत्यू झाल्यास शस्त्र परवान्यावरील शस्त्र तात्काळ शासकीय शस्त्रागारात जमा करण्यात यावे असे जमा करण्यात आलेले शस्त्र ६ महिन्यांच्या आत कायदेशीर वारसाने ताब्यात घेऊन त्याची विल्हेवाट (दुसऱ्या परवानाधारकास विकणे किंवा स्वत:च्या नावावर परवाना घेऊन शस्त्र स्वत:च्या ताब्यात घेणे) लावणे आवश्यक आहे. ६ महिन्यांच्या कालावधीनंतर शस्त्र ताब्यात घेण्याची विनंती मयत शस्त्र परवानाधारकाच्या कायदेशीर वारसाने केली असल्यास सदर प्रस्ताव परवाना प्राधिकाऱ्याने शासनाच्या मान्यतेसाठी पाठवावा. | सचिव (विशेष) गृह | १ महिना | मा. मंत्री (गृह ) | शासनाकडे प्रस्ताव पाठविताना खालील कागदपत्रांचा समावेश असावा<br>१. मयत शस्त्र परवानाधारकाच्या शस्त्र परवान्याची प्रत<br>२. शस्त्र परवानाधारकाच्या मृत्यूचा दाखला<br>३. शस्त्र परवान्यावरील शस्त्र शासकीय शस्त्रागारात जमा केल्याची पावती.<br>४. मयत शस्त्र परवानाधारकाच्या वारसदारांच्या उताऱ्याची प्रत.<br>५. शस्त्राची मागणी करणाऱ्या इतर वारसदारांचे ना हरकत प्रमाणपत्र.<br>६. शस्त्राची मागणी करणाऱ्या वारसदाराच्या शस्त्र परवान्याची प्रत. |

# मंत्रालयात जनतेसाठी प्रवेश देण्याबाबतची माहिती

| अ.क्र. (१) | सेवांचा तपशील (२) | सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे नाव व हुद्दा (३) | सेवा पुरविण्याची विहित मुदत (४) | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नाव व हुद्दा (५) | अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंत्रालय दैनिक प्रवेशपास | लिपिक | सकाळी १०-०० ते संध्याकाळी ५-०० | कक्ष अधिकारी, (विशा-४) ३० वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-१, कफ परेड, मुंबई-५. दूरध्वनी :२२१८८०९२ | १) संबंधीत प्रशासकीय विभागाच्या किमान उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची शिफारस. २) अलिकडचे दोन फोटो. ३) कार्यालयीन ओळखपत्र/फोटो ओळखपत्र याची प्रत. |

**सूचना .–** (१) मंत्रालयात जनता जनार्दन प्रवेशद्वार, उद्यान प्रवेशद्वार व आरसा प्रवेशद्वार येथून प्रवेश मिळेल.

(२) दैनंदिन प्रवेशपास सकाळी १०-०० वा. ते संध्याकाळी ५-०० वा.पर्यंत मिळेल.

(३) मंत्रालयात प्रवेश दुपारी २-०० वा. ते ५-३० वा.पर्यंत मिळेल.

(४) पॅन कार्ड/वाहन चालक परवाना/पारपत्र/निवडणूक ओळखपत्र/खाजगी आस्थापनेचे ओळखपत्र इत्यादींपैकी एक मूळ प्रतीत प्रवेशद्वारावर दाखविणे आवश्यक आहे.

येथे पासपोर्ट साईज फोटो चिकटवावा

## मंत्रालय प्रवेशासाठी तात्पुरते प्रवेशपत्र मिळण्यासाठी अर्ज

**१) अनुक्रमांक (कार्यालयीन वापरासाठी)** :

**२) संपूर्ण नाव** :

**३) कार्यालयीन पदनाम** :

**४) कार्यालयीन पत्ता** :

**५) निवासी पत्ता** :

**६) संपर्क दूरध्वनी** : **१) कार्यालयीन** :

**२) निवासी** :

**३) मोबाईल** :

**७) शिफारस करणाऱ्या मंत्रालयीन विभागाचे सहसचिव/उप सचिव यांचे नाव व सही** :

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

**सूचना :-**

अर्जा सोबत खालील कागदपत्रे सादर केल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१) संबंधित प्रशासकीय विभागाच्या किमान उप सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची शिफारस

२) अलिकडचे दोन फोटो.

३) कार्यालयीन ओळखपत्र/फोटो ओळखपत्र याची प्रत.

# परिवहन विभाग

| अ.क्र. (१) | सेवांचा तपशील (२) | सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचारी यांचे नांव हुद्दा (३) | सेवा पुरविण्याची विहित मुदत (४) | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नांव हुद्दा (५) |
|---|---|---|---|---|
| १ | केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ९३ मध्ये वाहनाच्या लांबी/रुंदी/उंची/व्हॅग बाबत विहित केलेली परिमाणे मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम ११०, पोट-कलम (३) (ब) नुसार शिथिल करण्याचे अधिकार शासन निर्णय गृह विभाग, ५.३.२००९ अन्वये प्रधान सचिव (परिवहन) यांना प्रदान करण्यांत आलेले आहेत. शासन निर्णय गृह विभाग दि.१९.११.२००९ अन्वये (Over Dimensional Cargo/ Consingment) ओडीसी मालवाहू परवाना कार्यपध्दती नुसार ज्या मालवाहतूकदारांना लांबी ३३ मीटर, रुंदी ५ मीटर, उंची ६ मीटरहून अधिक परिमाणे असललेले ओडीसी माल राज्यातील एका ठिकाणाहून किंवा राज्यातून बाहेरील राज्यात न्यावयाचा असल्यास अशा मालवाहतूकदारांनी संबंधित उप/प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या शिफारशीसह वाहनांच्या संदर्भातील रंगीत छायाचित्र/कागदपत्रासह प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर परिमाणातून सूट देवून वाहतुकीच्या परवानगीचे आदेश निर्गमित केले जातात. | कार्यासन अधिकारी, गृह विभाग, परिवहन-२ ३० वा मजला, सेंटर-१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४०० ००५. | कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी २.०० नंतर परिपूर्ण प्रस्ताव कार्यासनास प्राप्त झाल्यानंतर प्रधान सचिव (परिवहन) यांना असलेल्या अधिकारानुसार त्याच्याकडून प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर शक्यतो एका दिवसात शासन परिमाणातून शिथिल करून वाहतुकीस परवानगी दिली जाते. | प्रधान सचिव (परिवहन) ३० वा मजला, सेंटर-१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४०० ००५. |



(शा.म.मु.) एच २७८९-४ (१०००-४-२०१३)

## नागरीकांच्या सनदेचे उद्दीष्ट/उद्देश

राज्य उत्पादन शुल्क विभागाची खालील उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी बांधिलकी हा या सनदेचा उद्देश आहे.

* कार्यप्रणाली व कार्यपध्दती यांचे कायदे व नियमांची परिणामकारक अंमलबजावणी करणे
* राज्याच्या विविध विकासात्मक व कल्याणकारी धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी तत्पर शुल्क वसुली करून महसुल उपलब्ध करणे.
* उचित माहिती व्यवस्थापन प्रणालीव्दारे उत्पादक,वितरक,किरकोळ विक्रेते, या विभागाचे अनुज्ञप्तीधारक यांना उच्च प्रतीची सेवा प्रदान करणे.

**संसाधने**

ही संसाधने स्वीकारून या उद्दीष्टपुर्तीचा प्रयत्न करणे

* पारदर्शक, उत्तरदायी व जबाबदार प्रशासन
* सत्वर व नम्रतापूर्वक माहितीचे प्रदान
* एकात्मिक व न्यायोचित फी व शुल्क निश्चिती

### प्रस्तावना

पेयमद्यासह इतर तत्सम पदार्थांवर उत्पादन शुल्क आकारण्याकरीता राज्यात जून, १९४९ पर्यंत अस्तित्वात असलेल्या कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत होती. १६ जून १९४९ पासुन मुंबई अबकारी कायद्याऐवजी मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ अंमलात आला व या विभागाचे नामकरण दारुबंदी व उत्पादन शुल्क असे करण्यात येऊन, विभागाला या कायद्याची अंमलबजावणी व दारुबंदी शिक्षण याकरिता उत्तरदायी ठरविण्यात आले.

राज्यात डिसेंबर १९६३ पर्यंत संपूर्ण दारुबंदी धोरण राबविण्यात आले. यानंतर संयुक्त दारुबंदी धोरण अंमलात आले. या संयुक्त धोरणांतर्गत प्रथम ताडी योजना अंमलात आली व तद्नंतर टप्प्याटप्प्याने पेयमद्य निर्मिती करण्यास परवानगी देण्यात आली. यानंतर अनुज्ञप्ती पध्दती अंमलात येऊन विदेशी पेयमद्य विक्रेता अनुज्ञप्ती, परवाना कक्ष, बिअर बार व किरकोळ देशी मद्य विक्री अनुज्ञप्ती देण्यात आल्या आहेत. यानंतर पुन्हा ऑक्टोबर, १९९० मध्ये विभागाचे नामकरण राज्य उत्पादन शुल्क विभाग असे करण्यात आले. यानंतर मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ चे नामकरण महाराष्ट्र दारूबंदी कायदा असे झालेले आहे.

## विभागाची कार्ये व जबाबदाऱ्या

या विभागामार्फत खालील कायद्यांची अंमलबजावणी केली जाते.

* (१) महाराष्ट्र दारूबंदी कायदा.
* (२) महाराष्ट्र औषधे (नियंत्रण) कायदा.
* (३) औषधे व सौंदर्य प्रसाधने (उत्पादन शुल्क) कायदा, १९५५.
* (४) महाराष्ट्र मळी (नियंत्रण) कायदा.
* (५) मादक व गुंगी आणणारे पदार्थ कायदा, १९८५.
* (६) स्पिरीच्युअस प्रिपरेशन (आंतर राज्य व्यापार व वाणिज्य) कायदा.

### विभागाचे ध्येय

आम्ही राज्याच्या नागरीकांना बांधील असून आश्वासित करतो की,

* अवैध मद्य निर्मिती व सेवनाचे प्रमाण कमी करणे
* ग्राहकांना वैध मद्य उपलब्ध करणे.
* मद्यप्राशन व मद्यविक्री यासाठी विविध तरतूदीव्दारे नियंत्रण ठेवणे.

### विभागाची मुख्य कार्ये

* (अ) पेयमद्ये, ज्यामध्ये मद्यार्काचा व मादक पदार्थांचा वापर करण्यात येतो अशी औषधे व सौंदर्य प्रसाधने यावरील उत्पादन शुल्क व फी बाबतच्या धोरणात्मक बाबी.
* (ब) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क व संबंधित यंत्रणा यांचे मदतीने संनियंत्रण व समन्वयन करणे.
* (क) महाराष्ट्र दारूबंदी कायदा व त्याखालील विविध कायदे व नियमांची अंमलबजावणी करणे.
* (ड) महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये देण्यात आलेले परवाने व अनुज्ञप्त्या यांचे निरिक्षण व संनियंत्रण करणे.
* (इ) याबाबत प्रादेशिक अधिकाऱ्यांना वेळोवेळी अधिकारांचे प्रदान करणे.
* (फ) वर्ग-अ व वर्ग- ब अधिकाऱ्यांच्या आस्थापना विषयक बाबी व जिल्ह्यास्तरीय कर्मचारी वर्गाची भरती.
* (ग) परिणामकारक तक्रार निवारण व्यवस्था.

## विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवा

**(अ)** विभागामार्फत सेवा देण्यात येणारे घटक

(१) मळी/मद्यार्क/पेयमद्य निर्माते

(२) सर्व प्रकारचे अनुज्ञप्ती/परवानाधारक व किरकोळ मद्य विक्रते

(३) मद्यप्राशन करणाऱ्या व्यक्ति.

शासन कार्यनियमावलीनुसार मंत्रालयस्तरावर या विभागात राज्य उत्पादन शुल्कांसंबंधी सर्व प्रकारच्या धोरणात्मक बाबी हाताळल्या जातात. हा मंत्रालयीन विभाग राज्य उत्पादन शुल्काचा प्रशासनिक प्रमुख आहे. यामुळे नागरीकांना या विभागाशी संबंधित सेवा थेट पुरविल्या जात नाहीत.

**(ब)** या विभागांतर्गत मंत्रालयीन स्तरावर हाताळण्यात येणाऱ्या बाबी:-

(१) नविन आसवणी अनुज्ञप्ती (नमुना 'आय ') मंजूरी, भारतीय बनावटीचे विदेशी मद्य निर्मिती करण्यासाठी अनुज्ञप्ती मंजूर करणे ( पीएलएल), देशी मद्य निर्मिती अनुज्ञप्ती (सीएल-१) देशीमद्य ठोक विक्री अनुज्ञप्ती (सीएल-२) मंजूरी, बिअर व वाईन निर्मिती करीता अनुज्ञप्ती (एफएलबीआर) मंजूरी, विप्रकृत मद्यार्क व इथेनॉल निर्मिती अनुज्ञप्ती

(२) निर्माणींना अतिरीक्त मद्यार्क परिमाण मंजूर करणे.

(३) नमुना ' आय ', पीएलएल, एफएल-१, एफएल-२, सीएल-१ ,सीएल-३ अनुज्ञप्त्या स्थलांतरीत करण्यासाठी परवानगी देणे.

(४) मळीची राज्याबाहेर व परदेशात निर्यातीस परवानगी देणे

(५) महाराष्ट्र दारूबंदी कायदा नुसार दाखल होणारे पुनरिक्षण अर्ज हाताळणे.

(उपरोक्त नमुद अ.क्र. १ ते ४ वरील प्रकरणांबाबत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांचेमार्फत प्रस्ताव प्राप्त होतात.)

कायदा व नियमातील तरतूदीनुसार मद्यासंबंधीची प्रकरणे ही संवेदनशील स्वरुपाची असल्यामुळे यावर निर्णय घेण्याकरीता विविध प्राधिकरणांकडून अहवाल व ना-हरकत प्रमाणपत्रे घ्यावी लागतात. उदा. कायदा व सुव्यवस्थेसंबंधी पोलीस विभागाकडून ना-हरकत आवश्यक आहे. धोरणात्मक बाबींसंबंधी प्रकरणांवर निर्णय घेण्याकरीता विविध विभाग उदा. विधी व न्याय विभाग, वित्त विभाग, महसुल विभाग, कामगार विभाग यांचे अभिप्राय आवश्यक असतात. काही प्रकरणी मंत्रीमंडळाची मान्यता आवश्यक असते. यामुळे मंत्रालयीन स्तरावरून देण्यात येणाऱ्या सेवांकरीता कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही. तथापि नागरीकांकडून प्राप्त होणाऱ्या पत्रव्यवहारावर त्वरीत कार्यवाही केली जाते. उर्वरीत प्रकरणे महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन आणि शासन कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ या कायद्यान्वये ठरवून दिलेल्या कालमर्यादेत निकाली काढण्यात येतात.

## (अ) विभागामार्फत देण्यात येणाऱ्या अनुज्ञप्त्या व मंजुरी प्राधिकारी

(महाराष्ट्र दारूबंदी कायदा, महाराष्ट्र मद्यार्क व पेयमद्य निर्मिती नियम, १९६६, मुंबई विदेशी मद्य नियम, महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ खालील )

| अ.क्र. (१) | अनुज्ञप्तीचे नाव (२) | उद्देश (३) | प्राधिकारी (४) | कालमर्यादा (५) | प्रस्तावासोबत आवश्यक कागदपत्रे (नियम) (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | नमुना 'आय ' | मद्यार्क व जलरहीत मद्यार्क निर्मिती | शासन | प्रस्ताव प्राप्तीपासून ३ महिन्यांच्या आत | महाराष्ट्र मद्यार्क व पेयमद्य निर्मिती नियम, १९६६ नुसार |
| २ | पीएलएल व सीएल-१ | पेयमद्य निर्मिती | शासन | प्रस्ताव प्राप्तीपासून ३ महिन्यांच्या आत | महाराष्ट्र मद्यार्क व पेयमद्य निर्मिती नियम, १९६६ नुसार |
| ३ | डीएस व आरएस | विप्रकृत मद्यार्क, विशेष विप्रकृत मद्यार्क, ईथेनॉल खरेदी, विक्री , साठा करणे | शासन | प्रस्ताव प्राप्तीपासून ३ महिन्यांच्या आत | स्पिरीच्युअस प्रिपरेशन (निर्मिती) नियम, १९५५ नुसार |
| ४ | एफएल-१ व सीएल-२ | पेयमद्य ठोक विक्रेता अनुज्ञप्ती | जिल्हाधिकारी/ आयुक्त,राउशु शासनाच्या पुर्व मान्यतेने | | मुंबई विदेशी मद्य नियम-१९५३ नुसार<br>महाराष्ट्र देशी मद्य नियम-१९७३ नुसार |
| ५ | एफएल-२ व सीएल-३ | किरकोळ मद्य विक्रेता अनुज्ञप्ती | संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा अनुज्ञप्ती मंजूरी समिती | शासनाच्या सध्याच्या धोरणानुसार सदर अनुज्ञप्ती देण्यावर बंदी घालण्यात आलेली आहे. | मुंबई विदेशी मद्य नियम - १९५३ नुसार<br>महाराष्ट्र देशी मद्य नियम - १९७३ नुसार |
| ६ | एफएल-३ | परवाना कक्ष अनुज्ञप्ती | संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा अनुज्ञप्ती मंजूरी समिती | अर्जदाराने संबंधित प्राधिकरणांच्या परवानग्या व ना-हरकत प्राप्त केल्यावर, परंतु प्रस्तावाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या कालावधीत | मुंबई विदेशी मद्य नियम - १९५३ व शासन परिपत्रक एफएलआर १३०२/सीआर५७/ इएक्ससी-२, दि. १ फेब्रुवारी २००५ नुसार |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ७ | एफएल/बीआर-२ | बिअर शॉप | संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा अनुज्ञप्ती मंजूरी समिती | प्रस्तावाच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत | मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ नुसार |
| ८ | फॉर्म 'ई' | उपहारगृहात सौम्य बिअर विक्री | संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा अनुज्ञप्ती मंजूरी समिती | प्रस्तावाच्या दिनांकापासून ६ महिन्यांत. | दि. स्पेशल परमिटस् ॲण्ड लायसन्स रुल्स, १९५२ नुसार |
| ९ | एम-१, एमएफ-२ | मोहाफुलांची खरेदी, विक्री, साठा व वितरण | संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा अनुज्ञप्ती मंजूरी समिती | प्रस्तावाच्या दिनांकापासून ६ महिन्यांत. | मुंबई मोहाफूल नियम, १९५० नुसार |
| १० | पॉपी-२ | वैद्यकीय उपयोगाकरीता अफुची खरेदी, विक्री, साठा व वितरण | संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा अनुज्ञप्ती मंजूरी समिती | प्रस्तावाच्या दिनांकापासून ६ महिन्यांत. | मुंबई ओपीयम नियम, १९५३ नुसार |
| ११ | नमुना एफएलएक्स | विदेशी मद्य प्राशन करणे, बाळगणे यासाठी | आजीवन अनुज्ञप्ती संबंधित क्षेत्राचे निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क एक दिवसीय परवाना विभागाचा अधिकृत एफएल-२ परवानाधारक | अर्जाच्या दिनांकापासून ३ दिवसांत तात्काळ | दि. स्पेशल परमिटस् ॲण्ड लायसन्स रुल्स, १९५२ नुसार |

शासनाच्या सध्याच्या धोरणानुसार नवीन एफएल-२ व सीएल-३ ह्या अनुज्ञप्ती मंजूर करण्यात येत नाहीत. मात्र अनुज्ञप्तीधारकाच्या विनंतीवरून व त्याने एफएल-२ अनुज्ञप्तीसाठी मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ या नियमात नमूद व सीएल-३ अनुज्ञप्तीसाठी महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये नमूद सर्व प्रकारच्या परवानग्या व ना-हरकत दाखले जोडून प्रस्ताव सादर केल्यास अनुज्ञप्ती स्थलांतराची परवानगी देण्यात येते.

## (ब) अनुज्ञप्ती स्थलांतरासाठी प्राधिकारी

| अ.क्र. (१) | अनुज्ञप्तीचे नाव (२) | क्षेत्र (३) | प्राधिकारी (४) | कालमर्यादा (५) | प्रस्तावासोबत आवश्यक कागदपत्रे (नियम) (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ' नमुना आय ' | राज्यात कोठेही | शासन | प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ३ महिन्यांत | महाराष्ट्र मद्यार्क व पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ नुसार<br>१. रु. ५ च्या कोर्ट फी स्टँपसह विहित नमुन्यातील अर्ज व रु. ५०० अर्जशुल्काचे चलान.<br>२. प्रस्तावित प्रकल्पाच्या ले-आऊट प्लॅनच्या ४ प्रती.<br>३. विद्युत पुरवठ्यासाठी संबंधित प्राधिकरणास केलेल्या अर्जाची प्रत.<br>४. सविस्तर प्रकल्प अहवाल<br>५. जागा मालकीबाबतची कागदपत्रे.<br>६. प्रस्तावित जागा अकृषक असल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे आदेश.<br>७. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे ना-हरकत दाखल्यासाठी अर्ज केल्याची प्रत.<br>८. कंपनी रजिस्ट्रेशन दाखल्याची प्रत.<br>९. भागीदारी असल्यास त्याची प्रत.<br>१०. भांडवल उभारणी तपशील<br>११. आयकर/विक्रीकर थकबाकी नसल्याबाबत संचालकांचे प्रतिज्ञापत्र<br>१२. केंद्र शासनाचे आय.ई.एम. |
| २ | पीएलएल व सीएल-१ | राज्यात कोठेही | शासन | प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ३ महिन्यांत | महाराष्ट्र मद्यार्क व पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ नुसार<br>१. रु. ५ च्या कोर्ट फी स्टँपसह विहित नमुन्यातील अर्ज व रु. ५०० अर्जशुल्काचे चालान |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | | | | २. प्रस्तावित प्रकल्पाच्या ले-आऊट प्लॅनच्या ४ प्रती<br>३. विद्युत पुरवठ्यासाठी संबंधित प्राधिकरणास केलेल्या अर्जाची प्रत<br>४. सविस्तर प्रकल्प अहवाल<br>५. जागा मालकीबाबतची कागदपत्रे.<br>६. प्रस्तावित जागा अकृषक असल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे आदेश<br>७. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे नाहरकत दाखल्यासाठी अर्ज केल्याची प्रत<br>८. कंपनी रजिस्ट्रेशन दाखल्याची प्रत<br>९. भागीदारी असल्यास त्याची प्रत<br>१०. भांडवल उभारणी तपशील<br>११. आयकर/विक्रीकर थकबाकी नसल्याबाबत संचालकांचे प्रतिज्ञापत्र<br>१२. केंद्र शासनाचे आय.ई.एम. |
| ४ | एफएल-१, सीएल-२, एफएल-२,सीएल-३, एफएल-३, एफएल/ बीआर-२ | त्याच तालुक्यात | जिल्हाधिकारी | नियमात नमूद सर्व परवानग्या, ना-हरकती सह प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ३ महिन्यांत | महाराष्ट्र मद्यार्क व पेय मद्य निर्मिती नियम, १९६६, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३, महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ नुसार--<br>१. कारणे नमूद करून व रु. ५ किमतीचा कोर्ट फी स्टँप लावून विहित अर्ज<br>२. अनुज्ञप्तीची प्रत<br>३. गेल्या ५ वर्षांत विक्रीमध्ये घट आल्याबाबतचे विवरणपत्र<br>४. त्या क्षेत्रातील मद्य पिणाऱ्यांची गैरसोय होणार नसल्याबाबत ग्रामपंचायतीचे |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | ना-हरकत प्रमाणपत्र किंवा संबधित निरीक्षक,राउशु यांचे प्रमाणपत्र |
| | | | | | ५. जर प्रस्तावित स्थलांतराचे ठिकाण ग्रामपंचायत क्षेत्रात असल्यास ग्रामसभेचे ना-हरकत प्रमाणपत्र व नगरपालिकाक्षेत्रात असल्यास नगरपालिकचे ना-हरकत प्रमाणपत्र |
| | | | | | ६. बांधकाम अधिकृत असल्याबाबत संबंधित प्राधिकरणाचे प्रमाणपत्र |
| | | | | | ७. त्या जिल्ह्यातील अनुज्ञप्त्यांच्या प्रमाणात स्थलांतरित होणाऱ्या अनुज्ञप्त्या १५% पेक्षा जास्त नसाव्यात. |
| | | | | | ८. ग्रामसभेच्या किंवा नगर-परिषदेच्या ठरावामुळे अनुज्ञप्ती बंद होऊन त्यानुसार स्थलांतर होत असल्यास प्रमाणपत्र |
| | | | | | ९. स्थलांतरित होणाऱ्या प्रस्तावित ठिकाणाची लोकसंख्या व त्या ठिकाणी असलेल्या मद्यविक्री अनुज्ञप्त्यांची संख्या यांचा अहवाल |
| | | | | | १०. अनुज्ञप्तीधारकाचा जबाब |
| | | | | | ११. जागा मालकीबाबत कागदपत्रे |
| | | | | | १२. जागा भाड्याची असल्यास भाडेकरार, जागामालकाचे किंवा सोसायटीचे ना-हरकत प्रमाणपत्र |
| | | | | | १३. सीएल-३ अनुज्ञप्तीकरिता कायदा व सुव्यवस्थेबाबत पोलीस विभागाचा अहवाल. |
| | | | | | १४. कमीतकमी १६ वर्ग मीटर जागा असणे आवश्यक आहे. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | १५. प्रस्तावित जागेच्या नकाशाच्या ४ निळ प्रती (ब्ल्यू प्रिंट) |
| | | | | | १६. प्रस्तावित जागा अंतरनिबंधमुक्त असल्याचे प्रमाणपत्र |
| | | | | | १७. सीएल-३ अनुज्ञप्तीकरिता प्रस्तावित जागेपासून दुसरी सीएल-३ अनुज्ञप्ती नसल्याबाबत अहवाल |
| | | | | | १८. स्थलांतराची परवानगी दिल्यानंतर यासाठी आवश्यक असणारे विशेषाधिकार शुल्क भरावे लागते. |
| | | त्याच जिल्ह्यात | आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क | नियमात नमूद सर्व परवानग्या, ना-हरकती सह प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ३ महिन्यांत | महाराष्ट्र मद्यार्क व पेयमद्य निर्मिती नियम, १९६६, मुंबई विदेशी मद्य नियम - १९५३, महाराष्ट्र देशी मद्य नियम - १९७३ नुसार कागदपत्रे वरील प्रमाणे |
| | | एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात, मुंबई शहर व मुंबई उपनगर | राज्य शासन | नियमात नमूद सर्व परवानग्या, ना-हरकती सह प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ३ महिन्यांत | महाराष्ट्र मद्यार्क व पेयमद्य निर्मिती नियम, १९६६ नुसार मुंबई विदेशी मद्य नियम-१९५३, महाराष्ट्र देशी मद्य नियम-१९७३ नुसार कागदपत्रे वरील प्रमाणे. |

**४. खालील विषयावरील माहिती आमच्या अधिकाऱ्यांमार्फत उपलब्ध होऊ शकेल.**

| माहितीचा विषय | अधिकाऱ्याचे पदनाम | स्थान |
|---|---|---|
| मळी, देशीमद्य, बीअर, वाईन व ताडी | अवर सचिव (राउशु-३) | ५५३ विस्तार,पाचवा मजला, मंत्रालय, मुंबई-३२. |
| भारतीय बनावटीचे विदेशी मद्य, मळी व्यतिरिक्त इतर पदार्थांपासून मद्यार्क, निर्मिती, विप्रकृत व विशेष विप्रकृत मद्यार्क, निर्माणींना मद्यार्काचा अतिरिक्त कोटा. | कक्ष अधिकारी (राउशु-२) | ५५३ विस्तार,पाचवा मजला, मंत्रालय, मुंबई-३२. |
| राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापना विषयक बाबी, विभागाच्या अर्थसंकल्प विषयक बाबी व कर्मचाऱ्यांची भरती. | कक्ष अधिकारी (राउशु-१) | ५५३ विस्तार,पाचवा मजला, मंत्रालय, मुंबई-३२. |

**५. कार्यालयीन वेळेनंतर माहिती करीता**

मंत्रालयीन स्तरावरून नागरीकांना कोणत्याही थेट सेवा पुरविल्या जात नसल्यामुळे, कार्यालयीन वेळेनंतर नागरीकांना माहिती उपलब्ध होऊ शकत नाही.

तथापि नागरीक संबंधित क्षेत्राच्या अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क किंवा निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांचेशी संपर्क साधू शकतात. तातडीच्या परिस्थितीत नागरीक पोलिस नियंत्रण कक्ष किंवा जवळच्या पोलिस ठाण्यात संपर्क साधून माहिती घेऊ शकतात/तक्रार नोंदवू शकतात.

**६. विहित नमुन्यांची उपलब्धता**

सर्व प्रकारचे विहित नमुने सर्व निरिक्षक ,राज्य उत्पादन शुल्क, अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. तसेच, नागरीक, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या http//stateexcise.maharashtra.gov.in. या वेबसाईटवरुन डाऊनलोड करून घेऊ शकतात.

**७. तक्रार निवारण प्रणाली**

माहिती अधिकार अधिनियम-२००५ नुसार तक्रार निवारण अधिकारी व माहिती अधिकारी यांची माहिती राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in . या वेबसाईटवर ठेवण्यात आलेली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांची नावे पत्त्यासह यादी http//stateexcise.maharashtra.gov.in. या वेबसाईट वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन स्तरावरील तक्रार निवारण अधिकारी**

| पदनाम | स्थान | दुरध्वनी क्र. |
|---|---|---|
| उपसचिव व तक्रार निवारण अधिकारी | ३० वा मजला, सेटर-१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५. | ०२२-२२१८८१८३ |

नागरीक, त्यांच्या तक्रारी कोणत्याही अधिक्षक/निरिक्षक राज्य उत्पादन शुल्क कार्यालय किंवा संबधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी/उप विभागीय अधिकारी यांचेकडे किंवा संबंधीत पोलिस ठाण्यात नोंदवू शकतात.

८. नाव, पत्त्यासह केलेल्या तक्रारीबाबत तक्रारकर्त्याला त्वरीत पोच दिली जाते. तक्रारीच्या स्वरूपानुसार ३ दिवस ते एक महिन्यात तक्रारदाराला संबंधितांमार्फत उत्तर दिले जाते.

**९. अनुज्ञप्तीधारक/परवानाधारकांशी विचारविनिमय**

अनुज्ञप्तीधारक/परवानाधारकांच्या समस्यांबाबत संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत तसेच विभागाच्या विक्रेत्यांसोबत तसेच सामाजिक कार्यकर्ते व नागरीक यांचेसोबत नियमितपणे वरिष्ठ स्तरावर बैठका आयोजित केल्या जातात. प्राप्त व्यवहार्य सुचना व शेरे विचारात घेतले जाऊन त्याप्रमाणे समस्यांचे निराकरण तातडीने केले जाते.

**१०. नागरीकांकडून अपेक्षा व निवेदन**

नागरीकांची सनद हा शासन व नागरीक यांच्या मधील सहप्रयत्न आहे. याव्दारे विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा उंचावणे व सुधारणा करणे हा उद्देश आहे. यामध्ये सर्व नागरिकांनी आम्हास मदत करावी अशी खालीलद्वारे विनंती करण्यात येत आहे.

(अ) विभागाच्या नियमांचे पालन करून, मद्य निर्मिती व विक्री करून, राज्याच्या विकासात मोलाची कामगिरी बजावण्यासाठी महसुलात वाढ करण्यासाठी मदत.

(ब) मद्यप्राशनासाठी विभागाच्या नियमांचे पालन करणे

(क) राज्य उत्पादन शुल्काचा भरणा करून विक्री करण्यात आलेलेच मद्य प्राशन करावे.

(ड) अधिकृत विक्रेत्या कडूनच मद्य खरेदी करावे अथवा परवाना कक्षात प्राशन करावे.

(इ) विभागाचा मद्यप्राशन परवाना घ्यावा.

(फ) अवैध/बनावट मद्याविरूध्दच्या मोहिमेत नागरीकांनी सहकार्य करावे.

**११.** राज्य उत्पादन शुल्क विभागासंबंधी सर्व प्रकारची धोरणात्मक माहिती, मुख्य नियम, कार्ये व प्रदान करण्यात येणाऱ्या सेवा यासंबंधी सर्वप्रकारची माहिती मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ या पुस्तकात दिलेली आहे. सदर पुस्तक कोणत्याही विधी विषयक प्रकाशने विकणाऱ्या दुकानात उपलब्ध आहे. विविध प्रकारचे कायदे व नियमांची संख्या लक्षात घेता स्वतंत्र हस्त पुस्तिका प्रकाशीत करण्यात आलेली नाही. मात्र विहित छापील नमुन्यात त्या बाबी संबंधी नियम व कागदपत्रांची सुची छापलेली आहे. विशिष्ट प्रकारच्या माहितीची आवश्यकता असल्यास, नागरीकांना त्यानुसार संबंधित स्तरावरून माहिती अधिकारान्वये सदर माहिती प्राप्त करून घेता येते.

**१२. विभागाचा दृष्टिकोन**

(अ) कायदेशीररीत्या मद्यार्क , पेयमद्ये व सौंदर्य प्रसाधने यांची निर्मिती व विक्री याव्दारे शासन महसुलात वाढ करणे.

(ब) मद्यार्क , पेयमद्ये , सौंदर्य प्रसाधने व औषधे निर्मात्यांना व ठोक विक्रेत्यांना अनुज्ञप्त्या मंजूर करणे

(क) मुंबई दारुबंदी कायदा १९४९ मध्ये नमुद अवैध मद्य व मादक पदार्थ यांच्या निर्मितीवर नियंत्रण ठेवणे तसेच एन.डी.पी.एस कायदा १९८५ अन्वये मादक पदार्थावर नियंत्रण ठेवणे.

(ड) नागरीकांशी प्रत्यक्ष संपर्क असणाऱ्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांना जास्तीत जास्त अधिकारांचे प्रदान करणे

(इ) अवेध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्री यावर ग्राम रक्षक दलाच्या मदतीने नियंत्रण ठेवणे.

(फ) महसुली जमा व तक्रार निवारण करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान प्रणालीचा वापर करणे.

**" सेवा विषयक तपशिल " राज्य उत्पादन शुल्क**

| माहितीचा विषय | | अधिकाऱ्याचे पदनाम | स्थान |
|---|---|---|---|
| मळी, देशीमद्य, बीअर, वाईन व ताडी | मळी, देशीमद्य, बीअर, वाईन व ताडी संबंधी बाबी | अवर सचिव (राऊशु-३) | ५५३ विस्तार, पाचवा मजला, मंत्रालय, मुंबई-३२. |
| भारतीय बनावटीचे विदेशी मद्य, मळी व्यतिरिक्त इतर पदार्थापासून मद्यार्क, निर्मिती, विप्रकृत व विशेष विप्रकृत मद्यार्क, निर्माणींना मद्यार्काचा अतिरीक्त कोटा. | भारतीय बनावटीचे विदेशी मद्य, परवाना कक्ष, मळी व्यतिरिक्त इतर पदार्थापासून मद्यार्क निर्मिती, विप्रकृत व विशेष विप्रकृत मद्यार्क, इथेनॉल संबंधी बाबी. | कक्ष अधिकारी (राऊशु-२) | ५५३ विस्तार, पाचवा मजला, मंत्रालय, मुंबई-३२. |

## तुरुंग विभाग

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | जन्मठेप झालेल्या बंद्यांना चांगल्या वर्तणूकीच्या आधारे जिल्हा दंडाधिकारी/पोलीस आयुक्त यांचा अहवाल, सल्लागार मंडळाची शिफारस बंद्यांने भोगलेल्या शिक्षेचा तपशिल इ. माहितीसह कारागृह महानिरीक्षक यांच्याकडून मुदतपूर्व मुक्ततेचे आलेले प्रकरण. | मा. राज्यमंत्री (गृह). | विभागात प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर ६ महिने. | मा. मंत्री (गृह) |
| २ | कारागृहातील बंद्यांना खुल्या कारागृहातून स्वतंत्रपणे खुली वसाहत, आटपाडी,जि.सांगली येथे पाठविण्याकरिता कारागृह महानिरीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली समितीने शिफारस केलेल्या बंद्यांचे आदेश काढणे. | मा. राज्यमंत्री (गृह). | विभागात प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर १ महिना. | मा. मंत्री (गृह) |
| ३ | विभागीय आयुक्त यांनी बंद्यांची अभिवचन रजा मंजूर करण्यास नकार दिला असेल त्याविरुध्द अपील करताना विभागीय आयुक्तांनी अभिवचन रजा मंजूर केली आहे त्या आदेशाची प्रत जोडून बंद्यांनी कारागृहामार्फत अपील करणे. | मा. राज्यमंत्री (गृह). | विभागात प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर दीड महिना. | मा. मंत्री (गृह) |
| ४ | कारागृह महानिरीक्षक यांच्या नियंत्रणाखालील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रस्तावावर कार्यवाही करणे. | प्रधान सचिव (अपील व सुरक्षा). | विभागात प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर १ महिना. | मा. राज्यमंत्री (गृह). |
| ५ | कारागृह महानिरीक्षक यांनी वर्ग-३ च्या ज्या कर्मचाऱ्यांविरुध्द शिक्षेची कार्यवाही केलेली आहे त्याबाबतचे अपील. | प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) | विभागात प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर १ महिना. | मा. राज्यमंत्री (गृह). |
| ६ | सरळसेवेने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करणे. | मा. मंत्री (गृह) | विभागात प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर १ महिना. | ... |

**भारतात वैधरित्या राहणाऱ्या विदेशी नागरीकांच्या व्हिसा मुदतवाढीबाबत**

| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नाव व हुद्दा | सेवांच्या प्राप्तीसाठी अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | भारतात वैधरित्या राहणाऱ्या बांगलादेशी व पाकिस्तानी नागरिकांना दीर्घ व्हिसा मुदतवाढ देण्यासंदर्भातील प्रकरणे. | कार्यासन अधिकारी (विदेशी-२) नवीन प्रशासकीय भवन, ९ वा मजला, मुंबई-३२. दूरध्वनी क्र. २२०२२६८८. | पाकिस्तानी आणि बांगलादेशी नागरीकांच्या संदर्भात त्यांच्या भारतामधील कायम वास्तव्याच्या संदर्भात प्रथम दीर्घ व्हिसा मुदतवाढीबाबतचे प्रस्ताव संबधित विदेशी नोंदणी अधिकारी यांचेकडून विहित प्रपत्रात व सर्व आवश्यक कागदपत्रांसह प्राप्त झाल्यानंतर त्यांची तपासणी करुन केंद्र शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात येतात. सदर प्रकरणी केंद्र शासन त्यांच्या व्हिसाला मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेते. एकदा केंद्र शासनाने मुदतवाढ दिल्यानंतर त्या नंतरची मुदतवाढ दरवर्षी विदेशी नोंदणी अधिकाऱ्यांकडून प्राप्त होणाऱ्या मुदतवाढीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने देण्यात येते. | उप सचिव, नवीन प्रशासकीय भवन, १२ वा मजला, मुंबई-३२. दूरध्वनी क्र. २२०२२७५४ | १. पारपत्र<br>२. व्हिसा<br>३. वास्तव्याचा परवाना<br>४. रजिस्ट्रेशन<br>उपरोक्त कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती. तसेच, Employment Visa साठी कंपनी ॲग्रीमेंट प्रत, Indemnity Bond व वरीलप्रमाणे सर्व कागदपत्रे. मेडीकल व्हिसासाठी-हॉस्पिटलचे प्रमाणपत्र व वरीलप्रमाणे सर्व कागदपत्रे. Student Visa साठी संबंधित विद्यापीठाचे वा कॉलेजचे प्रमाणपत्र. |
| २ | पाकिस्तानी व बांगलादेशी नागरीकांना भारतीय नागरीकत्व देण्याबाबतची प्रकरणे. | कार्यासन अधिकारी (विदेशी-२) नवीन प्रशासकीय भवन, ९ वा मजला, मुंबई-३२. दूरध्वनी क्र. २२०२२६८८. | अर्जदाराचा नागरीकत्व मिळण्याचा अर्ज संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून सर्व आवश्यक कागदपत्रांसह प्राप्त झाल्यानंतर सदर अर्ज व कागदपत्रांची तपासणी करुन ३० दिवसांत अर्ज त्यासोबतच्या कागदपत्रांसह केंद्र शासनाच्या मंजूरीकरिता पाठविण्यात येतात. अर्जदारास नागरीकत्व प्रदान करणेसंदर्भात केंद्र शासन निर्णय घेते. | उप सचिव, नवीन प्रशासकीय भवन, १२ वा मजला, मुंबई-३२. दूरध्वनी क्र. २२०२२७५४ | वरीलप्रमाणे. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ३ | विदेशी जाणाऱ्या व्यक्तींचे भारतीय दस्तऐवज साक्षांकन करणे. | कार्यासन अधिकारी (विदेशी-२), नवीन प्रशासकीय भवन, ९ वा मजला, मुंबई-३२. दूरध्वनी क्र. २२०२२६८८. | विदेशात जाऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना त्या देशाचा व्हिसा घेण्यापूर्वी, त्यांचे भारतीय दस्तऐवज साक्षांकन करून घेणे आवश्यक असते. अशावेळी त्यांनी प्रथम ते दस्तऐवज महाराष्ट्र/केंद्र शासनाच्या मान्यताप्राप्त लेख प्रमाणकाकडून लेख प्रमाणित किंवा कंपन्यांच्या बाबतीत मान्यताप्राप्त चेंबर्स ऑफ कॉमर्स यांच्याकडून प्रमाणित करून ते कक्ष अधिकारी, गृह विभाग, ९ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-३२ येथून दुपारी २ ते ५ या वेळात साक्षांकित करून दिले जातात. हे साक्षांकन विनाशुल्क असून, दस्तऐवज त्याच दिवशी साक्षांकन करून परत दिले जातात. | उप सचिव, नवीन प्रशासकीय भवन, १२ वा मजला, मुंबई-३२. दूरध्वनी क्र. २२०२२७५४. | वरीलप्रमाणे तसेच ज्या दस्तऐवजाचे साक्षांकन करावयाचे आहे तो दस्तऐवज नोटरी केलेला असला पाहिजे. |
| ४ | भारतात वैधरित्या राहणाऱ्या विदेशी नागरिकांना (बांगलादेशी व पाकीस्तानी नागरिक वगळून) व्हिसा मुदतवाढ देण्यासंदर्भातील प्रकरणे. | कार्यासन अधिकारी (विदेशी-१) नवीन प्रशासकीय भवन, ९ वा मजला, मुंबई-३२. दूरध्वनी क्र. २२०२२६८८. | विदेशी नागरिकांच्या संदर्भात (बांगलादेशी व पाकीस्तानी नागरिक वगळून) त्यांच्या भारतातील वास्तव्याच्या संदर्भात प्रथम व्हिसा मुदतवाढीबाबतचे प्रस्ताव संबंधित विदेशी नोंदणी अधिकारी यांचेकडून विहित प्रपत्रात व सर्व आवश्यक कागदपत्रांसह प्राप्त झाल्यानंतर त्यांची तपासणी केली जाते व ज्या व्हिसा प्रकरणी राज्य शासनास अधिकार आहेत त्या प्रकरणी राज्य शासन स्तरावर व्हिसा मुदतवाढ दिली जाते. तसेच ज्या व्हिसा प्रकरणी राज्य शासनास अधिकार नाहीत ती प्रकरणे केंद्र शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात येतात. सदर प्रकरणी केंद्र शासन त्याच्या व्हिसाला मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेते. 'X' व्हिसाबाबत एकदा केंद्र शासनाने मुदतवाढ दिल्यानंतर त्या नंतरची पुढील ४ वर्षे मुदतवाढ दरवर्षी विदेशी नोंदणी अधिकाऱ्यांकडून प्राप्त होणाऱ्या मुदतवाढीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने देण्यात येते. | उप सचिव, नवीन प्रशासकीय भवन, १२ वा मजला, मुंबई-३२. दूरध्वनी क्र. २२०२२७५४. | १. पारपत्र<br>२. व्हिसा<br>३. वास्तव्याचा परवाना<br>४. रजिस्ट्रेशन<br>उपरोक्त कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती. तसेच, Employment Visa साठी कंपनी ॲग्रीमेंट प्रत, Indemnity Bond व वरीलप्रमाणे सर्व कागदपत्रे. मेडीकल व्हिसासाठी हॉस्पिटलचे प्रमाणपत्र व वरीलप्रमाणे सर्व कागदपत्रे Student Visa साठी संबंधित विद्यापीठाचे वा कॉलेजचे प्रमाणपत्र. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ५ | विदेशी नागरिकांना (बांगलादेशी व पाकीस्तानी नागरिक वगळून) भारतीय नागरिकत्व देण्याबाबतची प्रकरणे. | कार्यासन अधिकारी (विदेशी-१), नवीन प्रशासकीय भवन, ९ वा मजला, मुंबई-३२. दूरध्वनी क्र. २२०२२६८८. | अर्जदाराचा नागरिकत्व मिळण्याचा अर्ज संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून सर्व आवश्यक कागदपत्रांसह प्राप्त झाल्यानंतर सदर अर्ज व कागदपत्रांची तपासणी करून अर्ज त्यासोबतच्या कागदपत्रांसह केंद्र शासनाच्या मंजूरीकरिता पाठविण्यात येतात. अर्जदारास नागरिकत्व प्रदान करणे संदर्भात केंद्र शासन निर्णय घेते. | उप सचिव, नवीन प्रशासकीय भवन, १२ वा मजला, मुंबई-३२, दूरध्वनी क्र. २२०२२७५४. | —"— |
| ६ | विदेशी जाणाऱ्या व्यक्तींचे भारतीय दस्तऐवज साक्षांकन करणे. | कार्यासन अधिकारी (विदेशी-१), नवीन प्रशासकीय भवन, ९ वा मजला, मुंबई-३२. दूरध्वनी क्र. २२०२२६८८. | विदेशात जाऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना त्या देशाचा व्हिसा घेण्यापूर्वी, त्यांचे भारतीय दस्तऐवज साक्षांकन करून घेणे आवश्यक असते. अशावेळी त्यांनी प्रथम ते दस्तऐवज महाराष्ट्र/केंद्र शासनाच्या मान्यताप्राप्त लेख प्रमाणकाकडून किंवा कंपन्यांच्या बाबतीत मान्यताप्राप्त चेंबर्स ऑफ कॉमर्स यांच्याकडून दस्तऐवज प्रमाणित करून ते कक्ष अधिकारी, गृह विभाग, ९ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-३२ येथून दुपारी २ ते ५ या वेळात साक्षांकित करून दिले जातात. हे साक्षांकन विनाशुल्क असून, दस्तऐवज त्याच दिवशी साक्षांकन करून परत दिले जातात. | उप सचिव, नवीन प्रशासकीय भवन, १२ वा मजला, मुंबई-३२ दूरध्वनी क्र. २२०२२७५४. | वरील कागदपत्रांबरोबरच ज्या दस्तऐवजाचे साक्षांकन करावयाचे आहे ते दस्तऐवज नोटरी केलेले असले पाहिजेत. |
| ७ | पोलीस क्लिअरन्स प्रमाणपत्र देणे. | कार्यासन अधिकारी (विदेशी-१), नवीन प्रशासकीय भवन, ९ वा मजला, मुंबई-३२. दूरध्वनी क्र. २२०२२६८८. | महाराष्ट्रात नोकरीच्या किंवा शिक्षणाच्या निमित्ताने अथवा इतर करणास्तव वास्तव्य केलेल्या विदेशी नागरिकांना पुन्हा त्यांच्या मायदेशी जाण्यापूर्वी किंवा अन्य कारणासाठी पोलीस क्लिअरन्स प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यास विहित विवरणपत्रामध्ये माहिती भरून मागणी करण्यात येते. अशी मागणी शासनाकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांची सर्व कागदपत्रे संबधित विदेशी नोंदणी अधिकाऱ्याकडे पाठवून अहवाल मागविण्यात येतो व प्राप्त अहवालाचे आधीचे अर्जदार विदेशी नागरिकास पोलीस क्लिअरन्स प्रमाणपत्र देण्यात येते. | उप सचिव, नवीन प्रशासकीय भवन, १२ वा मजला, मुंबई-३२, दूरध्वनी क्र. २२०२२७५४. | अ.क्र. १ व २ प्रमाणेच कागदपत्रे आवश्यक |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ८ | कार्यक्रमातील विदेशी कलाकारांच्या सहभागास परवानगी देणे. | कार्यासन अधिकारी (विदेशी-१), नवीन प्रशासकीय भवन, ९ वा मजला, मुंबई-३२. दूरध्वनी क्र. २२०२२६८८. | महाराष्ट्रात कुठेही होणाऱ्या खाजगी कंपन्यांच्या किंवा संस्थांच्या कार्यक्रमात विदेशी कलाकारांचा सहभाग असल्यास, त्याकरिता परवानगी देण्याबाबत संबंधित कार्यक्रमाच्या संयोजकांकडून आवेदने प्राप्त होतात. त्यानुसार संबंधित विदेशी नोंदणी अधिकाऱ्याकडून अहवाल घेण्यात येतो व अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यक्रमापूर्वी शासनस्तरावरून परवानगी देण्यात येते. | उप सचिव, नवीन प्रशासकीय भवन, १२ वा मजला, मुंबई-३२ दूरध्वनी क्र.२२०२२७५४. | अ.क्र. ४ व ५ प्रमाणेच कागदपत्रे आवश्यक |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई